पुणे महानगरपालिका कर्मचाऱ्यांचे मुखपत्र

# कल्याणवार्ता

• अंक : २९ • एप्रिल २०१३ • पृष्ठे ४

इंटरनेट आवृत्ती - www.punecorporation.org

## नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत महिला सबलीकरण व सक्षमीकरण केंद्राचे उद्घाटन

पुणे महानगरपालिका नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत औंध क्षेत्रीय कार्यालय येथे महिला



सबलीकरण व सक्षमीकरण केंद्र सुरु करण्यात आले आहे. या केंद्राचे उद्घाटन दिनांक ३/४/१३ रोजी प्रभाग समिती अध्यक्ष मा. सौ. संगिताताई गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमास मा. सौ. शशिकलाताई गायकवाड, मा. सौ. अर्चनाताई कांबळे, मा. श्री. नितीन उदास, महापालिका सहाय्यक आयुक्त, औंध क्षेत्रीय कार्यालय, मा. श्री. हनुमंत नाझीरकर, प्रकल्प संचालक, नागरवस्ती विकास योजना विभाग, मा. श्री. रामदास चव्हाण, प्रकल्प अधिकारी, श्री. मुकुंदा महाजन, उप प्रकल्प अधिकारी, श्री. संदिप कांबळे, वस्तीसेवक, औंध क्षेत्रीय कार्यालयांतर्गत काम करणाऱ्या समुहसंघटिका, समुपदेशिका व औंध विभागातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस "मी सावित्री बोलतेय" या एकपात्री नाटकाचे सादरीकरण कु. प्रियंका मिसाळ यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक समुपदेशिका गौरी कासार यांनी केले. सदर केंद्राचा उद्देश पुणे महानगरपालिका हद्दीतील गरजू, अत्याचारीत महिलांना कायदेशीर मदत मोफतपणे देणे हा आहे. कायद्याचा अधार घेवून महानगरपालिकेच्या वकिलांमार्फत केसेस मोफत सोडविल्या जाणार आहेत. महिला आर्थिक सबलीकरणासाठी महानगरपालिकेच्या वेगवेगळ्या योजना व केंद्र-राज्य सरकारच्या योजना, जिल्हा महिला बाल कल्याण समितीच्या योजना व बँकेच्या योजना, महिला आरोग्याबाबत योजना, इत्यादी अनेक प्रकारची माहिती या सबलीकरण केंद्रातून मिळणार आहे. महिलांचे संघटीकरण, स्वसंरक्षण, स्त्री अस्तित्व ओळख, महिलांकडे बघण्याचा सकारात्मक दृष्टीकोन याबाबत जाणीव जागृती कार्यक्रमातून होणार आहे. महिला दक्षता कमिटी, महिला सहाय्य कक्ष, पोलिस चौकी, इत्यादी विषयी माहिती देण्यात येणार आहे. पुणे शहरातील इतर संस्थांची माहिती व मदत या सबलीकरण केंद्रातून मिळणार आहे. वैकल्पिक वाद निवारण केंद्र तसेच तात्पुरत्या निवाऱ्याची सोय इत्यादी मदत केली जाणार आहे.

मा. सौ. संगिताताई गायकवाड व मा. सौ. अर्चनाताई कांबळे यांनी महिलांना या केंद्राचा वापर आपण आपल्या फायद्यासाठी कसा करुन घेता येईल, याबाबत मार्गदर्शन केले व महिला सबलीकरण केंद्राच्या वापराबाबत प्रभागातील अनेक महिलांना माहिती करुन द्यावी, असे आवाहन केले.

मा.श्री. हनुमंत नाझीरकर यांनी महिला सबलीकरण केंद्राविषयी सविस्तर माहिती दिली. पुणे शहरात ५ कौटुंबिक सल्ला केंद्रे सुरु असून नव्याने १० केंद्रे क्षेत्रीय कार्यालयात सुरु होणार आहेत. प्रत्येक केंद्रात आलेली केस ही गोपनीय असणार आहे. प्रत्येक केसला परिस्थितीनुसार सल्ला व कायदेशीर मार्गदर्शन केले जाणार आहे. तसेच, महिलांनी सक्षम कसे व्हावे याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले.

या केंद्रात समुपदेशक म्हणून काम करणाऱ्या सौ. अनुराधा जगताप यांची ओळख सर्व महिलांना करुन देण्यात आली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समुहसंघटिका वैशाली थोरात यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन मा.श्री. नितीन उदास यांनी केले.

## सफाई कर्मचाऱ्यांना सदनिका वाटप

डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजनेंतर्गत २५ वर्षे किंवा त्याहून अधिक सेवा झाली आहे त्यांना तसेच सेवेत असताना मृत्यू झाल्यास अशा सफाई कामगारांच्या निधनानंतर त्यांच्या पात्र वारसास मालकी तत्वावर मोफत सदनिका वाटपाचा सोडत कार्यक्रम दिनांक १०/४/२०१३ रोजी आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमासाठी मा.सौ.वैशाली बनकर, महापौर, मा. श्री. दिपक मानकर, उपमहापौर, मा. श्री. सुभाष जगताप, सभागृह नेता, मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त (इस्टेट), मा. श्री. अरविंद शिंदे, सभासद, मा.श्रीमती लता राजगुरु, अध्यक्ष, शहर सुधारणा समिती, मा.श्री. सुधीर जानजोत, सभासद, मा. सौ. सुरेखा कवडे, सभासद, मा. श्री. मंगेश जोशी, उप आयुक्त (समाज कल्याण), मा. सौ.पूनम मेहता, उप जिल्हाधिकारी तथा क्षमता बांधणी प्रशिक्षण समन्वयक, बिएसयुपी, मा. श्री. मधुकांत गरड, उप आयुक्त (वि.का.क्र.४), मा. श्री.डी.पी.मोरे, उप आयुक्त (गवनि),



मा. हनुमंत नाझीरकर, प्रकल्प संचालक (नावियो), मा. नितीन केंजळे, कामगार कल्याण अधिकारी, मा. श्रीमती मुक्ता मनोहर, सरचिटणीस, पुणे मनपा कामगार युनियन उपस्थित होत्या.

उप आयुक्त (समाज कल्याण) यांनी सदर योजनेची सविस्तर माहिती उपस्थितांना दिली. मा. महापौर यांचे हस्ते लाभार्थींना सदनिकांची चावी देण्यात आली. श्रीमती राईबाई जयवंत वाघमारे, कसबा विश्रामबागवाडा क्षेत्रीय कार्यालय या सोडतीमधील प्रथम लाभार्थी ठरल्या. वारजे येथील ६७ आणि हडपसर येथील ११० अशा एकूण १७७ सेवकांसाठी सोडत काढण्यात आली.

मोफत सदनिका वितरण करणारी पुणे महानगरपालिका ही राज्यातील पहिली महानगरपालिका ठरली आहे.

## जीवनशैली गुणवत्तेमध्ये पुणे शहराचा द्वितीय क्रमांक

भारतातील विविध शहरांची जीवनशैली गुणवत्ता (quality of life) संबंधी बैंगलोर स्थित जनाग्रह या स्वयंसेवी संस्थेमार्फत अहमदाबाद, बैंगलोर, चेन्नई, दिल्ली, हैद्राबाद, जयपूर,कानपूर, कोलकत्ता, मुंबई, पुणे व सूरत या ११ शहरांमध्ये शहरी क्षमता आणि साधने,शहरी नियोजन व रचना,पारदर्शकता,जबाबदारी व नागरी सहभाग, कायदेशीर राजकीय प्रतिनिधीत्व या मुद्यांवर लंडन व न्युयॉर्क या शहरांशी तुलनात्मक सर्वेक्षण करण्यात आले.

शहरी क्षमता आणि साधने यामध्ये शहराचे वाणिज्य, मनुष्यबळ, संस्थांची रचना, त्यांना दिलेले अधिकार यामधील प्रमुख बाबींचे विश्लेषण करण्यात आले. स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत आकारण्यात येणारे कर, निधी उभारण्यासाठी शासनाची मदत न घेता स्वबळावर कर्ज घेण्याची क्षमता, गुंतवणूकीचे अधिकार व नियोजन, कर्मचारी नेमणूक, पदोन्नती, शिस्तभंगाची कार्यवाही, कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन, क्षमतावृध्दी, कामावरील नियंत्रण, पर्यवेक्षण, ई गव्हर्नन्स, इत्यादीसाठी गुण देण्यात आले.

शहरी नियोजन व रचना यामध्ये शहराचे नियोजन, मेट्रोपॉलिटन नियोजन समिती, संस्थांची रचना,अधिकार, जागांवरील मालकी हक्क यांचे विश्लेषण करण्यात आले. शहराचा विकास आराखडा, वार्डस्तरीय आराखडा तयार करणे, अंमलबजावणीसाठी नियोजन, पुढील २०-२५ वर्षांचे विकास आराखडे तयार करणे, पुढील ५ वर्षांसाठी वॉर्डस्तरीय आराखडा तयार करणे, आराखड्यामध्ये उच्च व निम्नस्तरीय नियोजन करणे, वॉर्डस्तरीय आराखडा व शहराच्या आराखड्यामध्ये समन्वय, विकास आराखड्यामध्ये नागरिकांचा सहभाग, इत्यादींचे अनुषंगाने गुण देण्यात आले.

पारदर्शकता, जबाबदारी व नागरी सहभाग यामध्ये कार्यपध्दतीमध्ये नागरिकांचा सहभाग वाढविण्याच्या हेतूने संकेतस्थळांचा वापर, विविध विकास कामांची माहिती व अहवाल संकेतस्थळावर उपलब्ध करुन देणे, कामांचे अंतर्गत लेखापरीक्षण करुन घेणे, नागरिकांच्या सहभागातून स्थानिक स्वराज्य संस्थांचे अंदाजपत्रक तयार करणे, वॉर्ड स्तरावर प्रभाग समिती स्थापना, इत्यादीच्या अनुषंगाने गुण देण्यात आले.

कायदेशीर राजकीय प्रतिनिधीत्व यामध्ये राज्य निवडणूक आयोगामार्फत निवडणूकीची कार्यवाही, आरक्षण व सभासदत्वासंबंधी निर्णय घेणे, महापौरांचे कार्यकालावधी निश्चित करणे, महापौरांच्या व नगरसेवकांच्या निवडणूकीसंबंधी सूचना, इत्यादीबाबत गुण देण्यात आले.

सर्वेक्षणांती ११ शहरांपैकी सूरत शहराची प्रथम व पुणे शहराची द्वितीय क्रमांकासाठी निवड करण्यात आली. पुरस्काराचे स्वरुप मानचिन्ह व प्रशस्तीपत्रक असे आहे. नवी दिल्ली येथे दिनांक ४/४/१३ रोजी व्हाईस ऑफ इंडियाज सिटीझन अॅवॉर्ड या कार्यक्रमात पुरस्काराचे वितरण करण्यात आले.

पुणे शहराला मिळालेला पुरस्कार मा.श्री.एन.आर.नारायण मुर्ती यांचे हस्ते पुणे महानगरपालिकेचे मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (इस्टेट) श्री. राजेंद्र जगताप यांनी स्विकारला.

## गुढीपाडवा

चैत्राची सोनेरी पहाट
नव्या स्वप्नांची नवी लाट
नवा आरंभ, नवा विश्वास,
नव्या वर्षाची हिच तर खरी सुरवात

नव्या उत्साहात,नव्या आशेने, नव्या उमेदीने, नव्या स्वप्नांनी भारतीय संस्कृतीत नवीन वर्ष चालू होते ते गुढीपाडव्याने. या दिवशी प्रत्येक घरी गुढी उभी केली जाते. परीसर स्वच्छ करुन अंगणी रांगोळी काढून देवाची पूजा करुन, आंब्याची तोरणे दारात लावून, गुढी उभारून देवाच्या व घरातील वडीलधाऱ्यांच्या आशिर्वादाने नवीन वर्षाची सुरवात केली जाते. असे म्हटले जाते की ब्रम्हदेवाने सृष्टी निर्माण केली, ज्या दिवशी या सत्युगाला सुरवात झाली तो दिवस म्हणजे गुढीपाडवा.

साडेतीन मुहूर्तांपैकी गुढीपाडवा हा एक सण आहे. या दिवसाच्या विविध अख्यायिका प्रसिध्द आहेत. या अख्यायिकांनुसार अत्याचारी शक लोकांचा शालिवाहन राजाने पराभव केला तो हाच दिवस. तसेच प्रभु रामचंद्रांनी चौदा वर्षांचा वनवास संपवून रावणासह दुष्ट राक्षसांचा पराभव करुन चैत्र शुध्द प्रतिपदेला अयोध्येत पदार्पण केले म्हणून हा दिवस विजयोत्सव म्हणूनही साजरा केला जातो. या शुभमुहूर्तावर नवनवीन वस्तुंची खरेदी केली जाते. तसेच, कोणत्याही कामाची सुरवात करण्यास हा दिवस शुभ मानला जातो.

ज्याप्रमाणे बदल हा निसर्गाचा नियम आहे. जुना ऋतू जाऊन नवीन ऋतू येतो. झाडांची जुनी पाने गळून नवी पालवी फुटते काळाच्या महावृक्षावरदेखील जुने दिवस जाऊन नवीन दिवस येतात. असा नवा बहर, नवा मोहोर, नवी आशा, नवी स्वप्ने घेवून नवीन वर्ष येते. एक जानेवारी ही जरी नवीन वर्षाची सुरवात असली, पाश्चात्य संस्कृतीच्या अनुकरणाने सध्या लोक रात्रभर जागरण करुन, पार्ट्या करुन नवीन वर्षाची सुरवात करित असले तरी आपल्या भारतीय संस्कृतीत नववर्षाची सुरवात ही पावित्र्याने व मांगल्यानेच केली जाते.

चैत्र शुध्द प्रतिपदा, चैत्र महिन्याचा पहिला दिवस म्हणजेच गुढीपाडवा याच वेळेस वसंत ऋतूचे आगमन होते. या नवीन वर्षाचे स्वागत फक्त आपल्याकडूनच होत नाही तर निसर्गातील विविध पक्षांच्या किलबिलाटाने, कोकीळेच्या गायनाने, फुललेल्या गुलमोहराने, फळांचा राजा असलेल्या आंब्याच्या झाडाला लगडलेल्या कैऱ्यांनीही नववर्षाचे स्वागत होते.

पहाटे लवकर गुढी उभारली जाते,बांबूची काठी घेवून तिच्या टोकाला रेशमी वस्त्र, फुलांची माळ, साखरपाकाची माळ (साखरेच्या गाठी) घालून एक लोटी उपडी ठेवतात. या गुढीला कडुनिंब, फुले वाहून पहाटे त्याची पुजा केली जाते. नैवेद्य ठेवला जातो. संध्याकाळी गुढी उतरवली जाते. या दिवशी सर्व पूजेचे सामान घरातील असले तरी गुढीपाडव्याच्या दिवशी त्याला असामान्य महत्व असते.

भारतात प्रत्येक सण हे ऋतुंशी संबंधित असतात. ज्याप्रमाणे धुलिवंदन, रंगपंचमी या सणांना पाण्याचा वापर, श्रीरामनवमी, हनुमान जयंतीला कलिंगड, खरबुज या प्रकारची रसाळ फळे जी शरीरास थंडावा देतात असे नैवेद्य ठेवले जातात. आंब्याची पाने, कडुनिंबाची पाने, हरभरा डाळ, कैरी अशा पदार्थांना महत्व दिले जाते. गोडाबरोबर आंबट पदार्थांनाही या सणात महत्व दिले जाते. डाळीसारखे जड पदार्थ उन्हाळ्यात पचण्यास जड असतात परंतु कैरीसारख्या आंबट पदार्थांमुळे अन्न पचण्यास सोपे होते. चैत्रगौरीचे पुजन याच चैत्र महिन्यात होते. त्यास कैरीची डाळ, कैरीचे पन्हे यासारखे कैरीचे पदार्थ नैवेद्य म्हणून ठेवले जातात.

विविधतेने नटलेल्या आपल्या भारत देशात विविध सणांना अनन्यसाधारण महत्व आहे. ज्याप्रमाणे एका रंगपेटीतील विविध रंग चित्रांचे सौंदर्य खुलवितात त्याचप्रमाणे एका वर्षात येणारे विविध सण आपले आयुष्य सुंदर बनवितात. आपल्याला सामाजिक बांधिलकीने बांधून ठेवतात. आपल्याला नितीमूल्ये जपण्यास मदत करतात. त्यामुळे येणारा प्रत्येक सण हा आनंदाने साजरा करणे आवश्यक आहे.

नव्या स्वप्नांची नवी वाट, नव्या किरणांचा नवा साज
नव्या इच्छा नव्या आशा, आकांक्षाच्या नव्या दिशा
नवी झेप नवी उमेद, नव्या संधी नवा श्वास,
नव्या वाटेवरचा नवा विश्वास, नव्या प्रवासाची नवी आस

ही आस मनी धरून प्रत्येकाने नवीन वर्षाचे स्वागत करावे. जेवढी विविधता आपल्या देशात आहे तेवढेच विविध सण आहेत. परंतु हे सण साजरे करताना आपल्यामुळे इतरांना त्रास होणार नाही याची दक्षता प्रत्येकाने घेतलीच पाहिजे. ज्याप्रमाणे गुढीपाडव्याचे स्वागत वसंत ऋतूकडून कोकिळेच्या गायनाने, झाडांवरील नव्या पालवीने , आंब्याच्या दरवळलेल्या सुगंधाने कोणासही त्रास न देता होते तसेच निसर्गाच्या या गुणधर्माप्रमाणे आपण मानवजातीनेही स्वागत करणे आवश्यक आहे.

**स्नेहल गुद्देटी,**
**सल्लागार (कामगार) कार्यालय**

## ओळख गुणवंताची - श्री.श्रीरंग राजपाठक

ओळख गुणवंताची या सदरात श्री.श्रीरंग राजपाठक, सेवानिवृत्त विभागप्रमुख तथा व्यवस्थापक, पं.नेहरु स्टेडियम यांची ओळख करुन घेणार आहोत.

पुणे मनपामध्ये एकूण ३८ वर्षांची सेवा झालेल्या श्री.राजपाठक यांचा जन्म दि.३१ मार्च, १९५५ रोजी झाला. दि.२ जून, १९७५ रोजी पुणे मनपा कोठी कार्यालयात ज्युनिअर ग्रेड



लेखनिक म्हणून त्यांची नेमणूक झाली. सेवेत नवीन असतानाच त्यांनी जिन्नसवारीचे १० वर्षांचे पेंडींग असलेले काम ३ महिन्यांत पूर्ण केले. १९७५ ते १९९५ या कालावधीत त्यांनी आरोग्य खात्यामध्ये ज्युनिअर ग्रेड लेखनिक म्हणून पगार बिलाचे काम पाहिले. झाडूवाले, मेहतर, ड्रेनेज बिगारी सेवक अशा एकूण ११० सेवकांचे पगार बिल त्यांचेकडे होते. त्या काळी वेतन रोखीने होत असताना सर्व सेवकांना सुट्या पैशासह पगाराचे वाटप करुन अत्यंत प्रामाणिकपणे त्यांनी काम केले.

१९९५ मध्ये त्यांची सिनिअर ग्रेड लेखनिक म्हणून नेमणूक झाली. सिनिअर ग्रेड लेखनिक असतानाही त्यांनी पगारबिलाची कामे केली.आरोग्य विभागात बजेटचे काम केले. सन २००० साली कर आकारणी कर संकलन कार्यालयाकडे पेठ निरीक्षक म्हणून त्यांची बदलीने नियुक्ती झाली.

२००५ साली श्री. राजपाठक यांना सरलेखनिक पदावर बढती मिळाली. बढतीने त्यांची नियुक्ती कोठी कार्यालयाकडे झाली. सन २००७ मध्ये कार्यालय अधिक्षक म्हणून आयातकर कार्यालयाकडे बढतीने नियुक्ती झाली. सन २००८ मध्ये मुख्यलेखापाल कार्यालयाकडे वरिष्ठ अधिक्षक म्हणून बढती मिळाली. जानेवारी २००९ ते १५ ऑगस्ट २०१० या कालावधीत विभाग प्रमुख या पदावर सहकारनगर क्षेत्रीय कार्यालयाकडे काम पाहिले.

दि. १६ ऑगस्ट २०१० ते ३१ मार्च २०१३ अखेर त्यांनी पं.नेहरु स्टेडियम येथे व्यवस्थापक म्हणून काम पाहिले. दि.२ ऑगस्ट, २०१० रोजी व्यवस्थापक पदाचा पदभार स्विकारला.

पदभार स्विकारल्यानंतर प्रथमतः संपूर्ण मैदानातील झाडांच्या अनावश्यक फांद्यांची उद्यान कार्यालयाकडून छाटणी करुन घेतली. मैदानात जाण्याचे लोखंडी गेट कर्मशाळेकडून नवीन करुन घेतले. महापौर चषक क्रिडा स्पर्धांचे यशस्वी नियोजन केले. कै.बाबुराव सणस मैदानासाठी ३ वेळा ॲथलेटिक्स शूटिंग करुन पुणे मनपास प्रत्येकी १ लाख प्रमाणे रु.३ लाख जमा केले.क्लब ऑफ महाराष्ट्र बॅडमिंटन हॉलची रु.७ लाख थकबाकी असताना भूसंपादन विभागाकडून ताबा घेवून जानेवारी २०११ ते ३१ मार्च २०१३ अखेर रक्कम रु.१४ लाख कोष कार्यालयात बॅडमिंटन कोर्ट भाड्यापोटी जमा करुन दिले.

जून २०१० मध्ये एशियन ग्रँडपिक्स ॲथलेटिक्स स्पर्धेसाठी कै.बाबूराव सणस ग्राउंड येथील स्टिपल चेस हर्डल्स बालेवाडी क्रिडा संकुल येथे नेण्यात आले होते. श्री. राजपाठक यांनी बालेवाडी स्टेडियम येथे प्रत्यक्ष जावून तेथील उपसंचालक श्री.टेकाळे यांची प्रत्यक्ष भेट घेतली. बऱ्याचदा पत्रव्यवहार केला. हर्डल्स पुणे जिल्हा ॲथलेटिक्स संघटनेने नेले होते. त्यांना पत्र देवून मार्च २०१३ मध्ये सणस ग्राउंड येथे हर्डल्स परत आणले.

सणस स्टेडियम येथील बॅडमिंटन हॉल दुरुस्ती, मैदानास रिटेनिंग वॉलची उंची वाढविणे, ट्रॅकची दुरुस्ती, इत्यादी कामांसाठी क्षेत्रीय अधिकारी सहकारनगर यांचेशी संपर्क साधून क्रिडा समिती अध्यक्ष यांचे सल्ल्याने व सहकार्याने टेंडर काढून माहे मार्च २०१३ मध्ये सर्व बाबींची पूर्तता केली.

हडपसर हॅन्डबॉल स्टेडियमची संपूर्ण दुरवस्था झालेली होती. संपूर्ण विद्युत व्यवस्था व स्वच्छता व्यवस्थेची तोडफोड करण्यात आली होती. श्री. राजपाठक यांनी सदर स्टेडियमची मुख्य भवन खात्याकडून पुन:श्च दुरुस्ती करुन घेतली व मैदानाची साफसफाई करुन ते पुन्हा कार्यान्वित करण्यात आले.स्थानिक क्रिडा संस्था व पुणे हॅन्डबॉल अकॅडमी चालविण्यासाठी सदर मैदान सुसज्य केले आहे.

श्री.राजपाठक यांच्या कारकिर्दीतील विशेषत: ज्युनिअर ग्रेड लेखनिक ते व्यवस्थापक हा प्रवास व उत्कृष्ट कार्याचा उंचावत जाणारा आलेख नक्कीच उल्लेखनीय व सर्व सहकाऱ्यांना आदर्श घालून देणारा व प्रेरक निश्चितच आहे. श्री. राजपाठक दिनांक ३१ मार्च, २०१३ रोजी सेवानिवृत्त झाले. त्यांच्या यापुढील वाटचालीस कामगार कल्याण निधीतर्फे त्यांना हार्दिक शुभेच्छा.

# मनपा कर्मचारीनिर्मित फ्लाय ओव्हर लघुपटाची लिमका बुक्स ऑफ रेकॉर्ड मध्ये नोंद

लघुपट, चित्रपट, नाट्य या क्षेत्रातील कोणताही अनुभव नसताना पुणे महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांनी निर्माण केलेल्या फ्लाय ओव्हर लघुपटाची लिमका बुक्स ऑफ रेकॉर्डस २०१३ मध्ये नोंद करण्यात आलेली असून, शासकीय स्तरावर विशेषत: मनपा कर्मचारी यांनी नागरिकांमध्ये जनजागृतीकरिता केलेले प्रयत्न कौतुकास्पद असल्यामुळे लघुपट क्षेत्रातील फिल्म फॉर पब्लिक अवेअरनेस या वर्गवारीत या लघुपटाची नोंद करण्यात आली आहे. तसेच आतापर्यंत पहिल्यांदाच पुणे महानगरपालिकेच्या सेवकांनी केलेल्या कामाची नोंद लिमका बुक्स ऑफ रेकॉर्डमध्ये करण्यात आली आहे.

२२ मिनिटांच्या या लघुपटात रेल्वे रुळ ओलांडताना नियमांचे पालन करावे,हा विषय मांडलेला आहे. रेल्वे पुलाचा वापर न करता रेल्वे रुळावरुन पलीकडे घाई गडबडीत जात असताना कुटुंबातील कर्त्या महिलेचा नाहक बळी जातो व या घटनेचा परिणाम बेजबाबदार पतीच्या मानसिकतेवर होतो व त्याच्या मृत्यूनंतर सर्व कुटुंबच उध्वस्त होते असे प्रबोधनात्मक व भावस्पर्शी कथानक दिग्दर्शक श्री. कदम यांनी अतिशय उत्तमरित्या चित्रीत केले आहे.

भारतीय चित्रपटसृष्टीच्या शंभर वर्षांच्या कारकिर्दीमधील अनेक महत्वपूर्ण विषयास अनुसरुन काही निवडक चित्रपटांची नोंदही लिमका बुक्स ऑफ रेकॉर्ड २०१३ मध्ये करण्यात आली आहे.

लघुपट क्षेत्रातील फ्लाय ओव्हर लघुपटातील कथानक, कलाकार यांच्या सत्यतेबाबत व एकूणच लघुपट निर्मितीबाबत लिमका बुक्स ऑफ रेकॉर्डस यांच्या वतीने विविध टप्प्यांवर माहिती मागविली होती. या सर्व पूर्ततेकरिता श्री. गणेश देविदास कदम यांनी सातत्याने दोन वर्षे पाठपुरावा केला. अखेर या लघुपटाची लिमका बुक्स ऑफ रेकॉर्ड २०१३ मध्ये नोंद करण्यात आली. विशेषत: भारतीय चित्रपटांची १०० वर्ष या प्रवासातील फ्लाय ओव्हर संदर्भात व्यक्तिगत प्रयत्न पर्सनल एफर्टस मध्ये फिल्म ऑन पब्लिक अवेअरनेस म्हणून विशेष नोंद करण्यात आलेली आहे.

पुण्यामध्ये मागील वर्षी झालेल्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवामध्ये एक वेगळीच व प्रभावी कलाकृती म्हणून फ्लाय ओव्हर लघुपट दाखविण्यास आला होता.

त्याचबरोबर जयपूर आंतरराष्ट्रीय फिल्म फेस्टिव्हल, नाशिक आंतरराष्ट्रीय फिल्म फेस्टिव्हल, गुजरात आंतरराष्ट्रीय फिल्म फेस्टिव्हलमध्ये या लघुपटाची निवड करण्यात आली होती. जयपूर फिल्म फेस्टिव्हलमध्ये सादरीकरणानंतर नागरिकांकडून मोठ्या प्रमाणावर प्रशंसा करण्यात आली होती.

हा लघुपट नागरिकांना यू ट्युबवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

फ्लाय ओव्हर लघुपट निर्मितीकरिता पुणे विभागीय रेल्वे मंडळ, पुणे महानगरपालिकेतील सभागृह नेते मा. सुभाष जगताप, श्री. समीर दुगाणे, पुणे महानगरपालिका जनता संपर्क अधिकारी संजय मोरे, ओंकारेश्वर परिसरातील रिध्दीसिध्दी मंदिराचे पदाधिकारी त्याचप्रमाणे लघुपटाचे हितचिंतक शिवजीभाई पटेल यांचे विशेष सहकार्य लाभले.

फ्लाय ओव्हर लघुपटाच्या यशात श्री. गणेश देविदास कदम, श्री. गणेश चंद्रकांत दुगाणे, श्री. दिपक भोजले, श्री. सचिन दळवी, श्री. अशोक लांडगे, श्री. राजेश कांबळे, श्रीमती स्वाती देशपांडे, श्री. अजय गोळे, श्री. जयवंत शिंदे, श्री. संजय देवळे, श्री. राजेश वाझे, श्री. जयप्रकाश पाखरे या सर्वांचा बहुमोल वाटा आहे.

# अल्पपरिचय-यशवंतराव चव्हाण (१९१३-१९८४)

भारताचे उपपंतप्रधान यशवंतराव चव्हाण यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील देवराष्टे या गावी १२ मार्च १९१३ रोजी झाला. स्वातंत्र्य चळवळीत त्यांचा महत्वाचा सहभाग होता. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली व राज्याचे पहिले मुख्यमंत्री म्हणून त्यांचा शपथविधी झाला.महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाची व अनेक महत्वाच्या संस्थांची त्यांनी स्थापना केली. नाट्यसंमेलनाचे, मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटक व स्वागताध्यक्ष म्हणून त्यांची भाषणे गाजली. १९६२ साली ते भारताचे संरक्षण मंत्री झाले. अनेक महत्वाची मंत्रिपदे त्यांनी भूषविली. कृष्णाकाठ या आत्मचरित्राचे ७ फेब्रूवारी, १९८४ रोजी प्रकाशन झाले.

# कामगार प्रशिक्षण वर्गाचा समारोप समारंभ

पुणे महानगरपालिका कर्मचाऱ्यांचा कामगार प्रशिक्षण वर्ग क्र. ८३ व ८४ चा समारोप कार्यक्रम नुकताच महानगरपालिकेच्या घोलेरोड येथील आर्ट गॅलरी येथील प्रशिक्षण सभागृहात पार पडला.



या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून विपश्यना केंद्राचे अध्यक्ष, योगशिक्षक मा. दत्ता कोहिनकर (पाटील) यांचे सुखी जीवनासाठी या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी बोलताना त्यांनी सुखी जीवनाची दश:सूत्री, योगा, प्राणायाम व विपश्यना ध्यानाबाबत सविस्तर मार्गदर्शन करुन आहार-विहार व व्यायामाचे महत्व पटवून दिले. सुखी होण्यासाठी सकारात्मक विचारसरणी क्षमायाचना, मंगल मैत्रीबाबत सविस्तर मार्गदर्शन करुन तणावमुक्तीच्या महत्वाच्या खुबी कर्मचाऱ्यांना सांगितल्या व विपश्यनेचे शिबिर करण्याचे आवाहन केले. या शिबिरासाठी मनपाच्या कर्मचाऱ्यांना १४ दिवसांची परावर्तित रजा व शिक्षकांसाठी ऑन ड्युटीचा अध्यादेश जारी झाल्याची माहिती त्यांनी दिली. बऱ्याचशा कर्मचाऱ्यांनी या शिबिराला उपस्थित राहण्याची इच्छा व्यक्त केली.

सल्लागार (कामगार) मा. शिवाजी दौंडकर यांनी या कार्यशाळेचे आयोजन केले होते. पुणे मनपा नेहरु स्टेडियमचे व्यवस्थापक तथा कामगार शिक्षक श्री. मधुकर बिबवे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक सादर केले. त्यामध्ये त्यांनी प्रशिक्षण वर्गांतर्गत उपक्रमांबाबत माहिती दिली व कामगार प्रशिक्षण वर्ग सतत चालू रहावेत, असे मत व्यक्त केले. या प्रसंगी कामगार प्रशिक्षण वर्गांतर्गत घेण्यात आलेल्या परीक्षेचा निकाल जाहीर करुन विशेष प्राविण्य मिळविलेल्या कर्मचाऱ्यांचा ट्रॉफी व प्रमाणपत्र देवून गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्री. रामदास धावडे, वस्ती सेवक यांनी केले.

# पुणे महानगरपालिकेत अग्निशमन सेवा सप्ताह साजरा

पुणे मनपा अग्निशामक दलाचे वतीने दि.१४ ते २० एप्रिल, २०१३ या कालावधीत अग्निशमन सेवा सप्ताहाच्या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.दि.१४ एप्रिल रोजी अग्निशमन सेवा दिनाप्रित्यर्थ मध्यवर्ती अग्निशमन केंद्र येथे ध्वजारोहण करण्यात येवून, अग्निशमन दलात सेवा करीत असताना विविध घटनांमध्ये बलिदान दिलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

दिनांक १५ एप्रिल रोजी दु. ४ ते सायं. ६ या कालावधीत पुणे महानगरपालिका मुख्य भवन ते सारसबाग यादरम्यान सायकल फेरीचे आयोजन कण्यात आले. सायं.६ वाजता सारसबाग येथे भरविण्यात येणाऱ्या अग्निशमन साहित्य व उपकरण प्रदर्शनाचा उद्घाटन समारंभ आयोजित करण्यात आला होता.

दिनांक १७ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता मध्यवर्ती अग्निशमन केंद्र येथे शहरातील चित्रपट/नाट्यगृहांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी अग्निसुरक्षेच्या दृष्टीने आग प्रतिबंधक उपाययोजनांचे प्रशिक्षण देण्यात आले. तसेच, ओशो आश्रम, कोरेगाव पार्क, इनलॅक्स बुद्राणी हॉस्पिटल, अभिरुची मॉल, सिंहगड रोड, या ठिकाणी अग्निशमन दलाची प्रात्यक्षिके दाखविण्यात आली.

दिनांक १८ एप्रिल रोजी अग्निशमन सेवा सप्ताहानिमित्त एका कमिटीची नेमणूक करुन त्यामध्ये मुख्य अग्निशामक अधिकारी व सहाय्यक विभागीय अधिकारी यांनी दलाचे उपकेंद्रांना अचानक भेट देवून चांगल्या उपकेंद्राला बक्षिस देण्यात आले. मुख्य अग्निशामक अधिकारी, सहाय्यक विभागीय अधिकारी व स्टेशन ड्युटी ऑफिसर यांचेमध्ये आकाशवाणी, पुणे येथे एक चर्चात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. तसेच, मुख्य अग्निशामक अधिकारी यांचे दूरदर्शन केंद्र, पुणे येथे एक चर्चात्मक कार्यक्रम सादर करण्यात आला.

दिनांक १९ एप्रिल रोजी विविध ठिकाणी अग्निशमन दलाची प्रात्यक्षिके दाखविण्यात आली. दिनांक २० एप्रिल रोजी मध्यवर्ती अग्निशमन केंद्र येथे सामूहिक संचलन, सेवकांना बक्षिस वितरण, प्रात्यक्षिके व अग्निशमन सप्ताहाचा सांगता समारंभ करण्यात आला.

या सर्व उपक्रमास मनपाचे मा. पदाधिकारी, मा. अधिकारी तसेच, अग्निशमन दलातील अन्य जवान, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# १८ एप्रिल, वर्ल्ड हेरिटेज डे निमित्त पुणे महानगरपालिकेमार्फत विविध कार्यक्रमांचे आयोजन

पुणे शहराला मोठ्या प्रमाणावर ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा लाभलेला आहे. पुणे शहरामध्ये अनेक ऐतिहासिक मूल्ये असलेल्या वास्तू अस्तित्वात आहेत. पुणे मनपाचे हेरिटेज यादीनुसार सुमारे २५० ऐतिहासिक वास्तू/मिळकती पुणे शहरामध्ये आहेत. पुणे शहराचे ऐतिहासिक महत्व व मूल्ये नागरिकांना समजण्यासाठी ऐतिहासिक वारसा, स्थळे, वास्तू यांच्या जतन संवर्धनासाठी व पर्यटनासाठी देशात-परदेशात मोठे प्रयत्न चालू असून, यासाठी पुणे महानगरपालिकेने पुढाकार घेवून पुणे शहरामध्ये विविध प्रकल्प सुरु केले आहेत. पुणे मनपाच्या मालकीचे विश्रामबागवाडा, नानावाडा, महात्मा फुले मंडई या वास्तूंचे जतन संवर्धनाची कामे हाती घेतली आहेत. तसेच, नागेश्वर मंदीर, कसबा गणपती मंदीर, ओंकारेश्वर मंदीर या ट्रस्ट मालकीच्या मंदिरांची संवर्धनाची कामे सुरु करण्यात आली आहेत. त्याचप्रमाणे शनिवारवाडा ते विश्रामबागवाडा या परिसरात हेरिटेज वॉक हा महत्वपूर्ण प्रकल्प पुणे मनपा व जनवाणी यांचे संयुक्त सहभागातून सुरु करणेत आला आहे. तसेच, दिनांक १० व ११ डिसेंबर, २०१२ रोजी फ्रान्स, ॲम्बेसी, युनेस्को, इंडियन हेरिटेज नेटवर्क फाउंडेशन व पुणे मनपा यांचे संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. यामुळे पुरातत्व व ऐतिहासिक वारसा असलेल्या वास्तू व कलांच्या जतन संवर्धनाची चळवळ उभी राहण्यास व हेरिटेज वास्तूविषयक पुणे शहरामध्ये जनजागृती करण्यास मोठा हातभार लागलेला आहे.

दरवर्षी १८ एप्रिल हा दिवस वर्ल्ड हेरिटेज डे म्हणून जगभर साजरा केला जातो. हे औचित्य साधून पुणे शहरातील ऐतिहासिक वारसांची छायाचित्रे, माहिती व वास्तूंचे मूल्य दर्शविणारी पॅनेल तयार करणेचे नियोजन पुणे मनपाकडून करणेत आलेले आहे. या पॅनेल्सचे १८ एप्रिल ते २० एप्रिल या काळात बालगंधर्व रंगमंदीर कलादालन येथे प्रदर्शन भरविणेत आले. प्रदर्शनात काही मॉडेल्स, पेंटींगजचाही समावेश करण्यात आला. ऐतिहासिक वास्तूमध्ये सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. दिनांक १८ एप्रिल रोजी विश्रामबागवाडा येथे संवाद सेतु प्रस्तुत आकाशवेडी या एका अनोखी काव्य मैफीलीचे आयोजन करणेत आले. तसेच, २० एप्रिल रोजी जनवाणीच्या सहकार्याने आविष्कार थिएटर ग्रुप प्रस्तुत बया दार उघड हे नाटक विश्रामबागवाडा येथे आयोजित करण्यात आले.

## माहे एप्रिल, २०१३ सेवापूर्ती समारंभ

दि.३०/४/१३ रोजी कॅ. वडके हॉल येथे एप्रिल,१३ मधील सेवानिवृत्त ५३ अधिकारी/सेवकांसाठी सेवापूर्ती समारंभ आयोजित केला होता. यामध्ये ४० वयपरत्वे व १३ ऐच्छिक सेवानिवृत्तांचा सत्कार करण्यात आला.प्रमुख पाहुणे म्हणून मा. सुधाकर देशमुख, विशेष कार्याधिकारी, दक्षता तसेच, डॉ. अंजली साबणे, उप आरोग्य प्रमुख, डॉ. संजीव वावरे, सहाय्यक आरोग्य प्रमुख हे उपस्थित होते. प्रास्ताविकात मा.अरुण खिलारी, कामगार कल्याण अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सेवापूर्ती समारंभ आयोजित करण्यामागची भूमिका विषद केली व सेवानिवृत्त होणाऱ्या सर्व सेवकांना त्यांच्या भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

तदनंतर उप आरोग्य प्रमुख डॉ. साबणे यांनी सेवानिवृत्त सेवकांनी वैद्यकीय सहाय्य योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन केले.



सेवानिवृत्त होणारे डॉ. रमेश चव्हाण यांनी सेवानिवृत्त सेवकांतर्फे मनोगत व्यक्त करताना महानगरपालिकेतील विविध अनुभव सांगितले. तसेच, प्रत्येक सेवकाने प्रामाणिकपणे काम केल्यास त्याचा संस्थेस व स्वत:स देखील चांगला फायदा होतो ही बाब नमूद केली.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा.देशमुख यांनी मनपाची दीर्घ सेवा पूर्ण करुन सेवानिवृत्त होणाऱ्या सेवकांचे आभार मानले व सेवानिवृत्त सेवकांना आपल्या सेवानिवृत्तीप्रित्यर्थ मिळणाऱ्या सर्व रकमांची गुंतवणूक चांगल्या बँकांमध्ये करुन आपले उर्वरित आयुष्य आरोग्यसंपन्न व सुखासमाधानाने व्यतित करण्याबाबत नमूद करुन सर्वांना भावी आयुष्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.त्यानंतर सेवानिवृत सेवकांचा शॉल व स्मृतीचिन्ह देवून सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.नितीन केंजळे, कामगार कल्याण अधिकारी यांनी केले व आभार प्रदर्शन श्री. रमेश ढाकोळ यांनी केले.


कल्याणवार्ता
एप्रिल, २०१३
प्रकाशक तथा अध्यक्ष
कामगार कल्याण निधी
मा. आयुक्त,
पुणे महापालिका
❖ संपादक ❖
मा.सल्लागार (कामगार)
❖ कार्यकारी संपादक ❖
कामगार कल्याण अधिकारी
❖ सहाय्यक ❖
सौ. ज्योती अ.भोसले
❖ मुद्रक ❖
जयंत पवार
व्यवस्थापक,
मुद्रणमहर्षि मामाराव दाते
मुद्रणालय, मनपा, पुणे.
❖ प्रकाशन स्थळ ❖
पुणे महापालिका
शिवाजीनगर,
पुणे ४११ ००५
या अंकात प्रसिध्द झालेल्या
मतांशी प्रकाशक, संपादक,
कार्यकारी संपादक व पुणे
महापालिका
सहमत असतीलच असे नाही.
❖ संपर्क ❖
सल्लागार (कामगार)
कार्यालय,
पुणे महानगरपालिका.
दूरध्वनी क्र. २५५० १२५१/
१२५२/१२५५
ईमेल आयडी
shivaji.daundkar
@punecorporation.org


## विवेकानंदांचे उपदेश

१. वेदान्त पापाचे अस्तित्व मानीत नाही, तो फक्त भ्रोतीचेच अस्तित्व मानतो आणि मी कमकुवत आहे, मी पापी आहे, मी दु:खी आहे, माझ्या ठिकाणी बल मुळीच नाही, मी कोणतेही कार्य करण्यास समर्थ नाही असे म्हणणे हाच सर्वात मोठा भ्रम होय. वेदान्त आपल्याला हेच सांगतो.

२. ज्यांचा ईश्वरावर विश्वास नाही ते नास्तिक होत, असे प्राचीन धर्मांनी म्हटले आहे. नवा धर्म म्हणतो की ज्यांचा स्वत:वर विश्वास नाही ते नास्तिक होत.

३. बल हेच जीवन होय, दुर्बलता म्हणजे मृत्यू. बल हाच परम आनंद होय, शाश्वत व अमर जीवन होय. दुर्बलता म्हणजे सतत भार, सतत चिंता, सतत दु:ख होय. दुर्बलता म्हणजे मृत्यू होय. लहानपणापासूनच रचनात्मक, शक्तिदायी व साहाय्यकारी विचारांना तुमच्या मेंदूत प्रवेश करु द्या.

## पुणे मनपामध्ये जागतिक आरोग्य दिन साजरा

पुणे महानगरपालिका आरोग्य खात्यामार्फत दिनांक ७/४/२०१३ रोजी जागतिक आरोग्य दिनाचे आयोजन करण्यात आले.

या वर्षीचे जागतिक आरोग्य दिनाचे घोषवाक्य कंट्रोल युवर ब्लड प्रेशर असे होते. त्यानिमित्त सोमवार दिनांक ८/४/२०१३ रोजी पुणे महानगरपालिकेतील सर्व पुरुष अधिकारी व कर्मचाऱ्यांकरिता आरोग्य खात्यातर्फे कै. वडके सभागृह, पुणे मनपा येथे मोफत आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते.

सदर शिबिरामध्ये पुरुष अधिकारी व कर्मचाऱ्यांची रक्तदाब व वजन तपासणी करण्यात आली. तपासणीपूर्वी आरोग्य प्रमुख डॉ. एस.टी.परदेशी यांनी सर्व उपस्थितांना रक्तदाबाचे आजार टाळण्याकरिता व रक्तदाब नियंत्रणामध्ये ठेवण्याकरिता मानसिक, शारिरीक व सामाजिक आरोग्य कसे सांभाळावे याबाबत मार्गदर्शन केले.



एकूण १८४ पुरुष अधिकारी व कर्मचाऱ्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. यामध्ये ७९ पुरुषांचा रक्तदाब जास्त आढळून आला. आवश्यकतेनुसार संबंधितांना वैद्यकीय सल्ला देण्यात आला. रक्तदाब अधिक असलेल्या पुरुषांना पुणे मनपाचे दवाखान्यांमध्ये पुढील आवश्यक तपासण्या/उपचार करणेबाबत सल्ला देण्यात आला.

## सल्लागार (कामगार) विभाग

सल्लागार (कामगार) विभागाचे काय वर्णू मी कौतुक
सांस्कृतिक कलामंचाच्या आधारे व्यासपीठ मिळाले आपसूक ।।०।।

मिळे सल्लागार (कामगार) व्यासपीठाचा आधार
सांस्कृतिक कलामंचाच्याद्वारे उघडले व्यासपीठाचे द्वार
विविधरंगी सुप्त कलागुणांना वाव मिळतो खरोखर
म्हणूनी मानितो आम्ही त्यांचे मन:पूर्वक आभार ।।०।।

अनोखे व्यासपीठ बहु मिळाले आम्हांस
दबली गेलेली स्वप्ने आली भरास भरास
जुन्या साऱ्या आमुच्या अमुर्त इच्छांना
मुर्त रुप लाभले आशा आकांक्षांना ।।०।।

शब्दांत व्यक्त कराव्या कशा अंतरीच्या भावना
अंतरीचा भावगंध सर्वत्र दरवळावा हीच मनोकामना
शोधिले स्वप्नांत जे वास्तविकतेत पूर्ण जाहले
दाटूनी आली म्हणूनी लेखनीतून ही शब्दफुले ।।०।।

काय वर्णावे सल्लागार (कामगार) चे विधायक कार्ये
कामगार कल्याणासंबंधीत असे जे जे कार्य
त्या त्या ठिकाणी असे सदैव कामगारां पाठीशी
उत्तरोत्तर अशीच किर्ती वाढावी हीच आस उराशी ।।०।।

सुरेश परदेशी सरांमुळे लाभले हे भाग्य आम्हां
बहुमोल प्रोत्साहन तयांचे नेहमीच पाठीशी असते आम्हां
धडपड तयांची प्रत्येकांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा
नशीबानेच मिळाले असे मार्गदर्शन आम्हा ।।०।।

साक्षी ऐसे अमर करुनी हे व्यासपीठ मिळाले
सहस्त्रकर कर्मचारी हे उधळीतो स्वकरे भावफुले
स्वहस्त आम्ही त्यांवरी उधळू फुले प्रिती–अक्षता
आभार मानितो आपुले जोडोनी सहस्त्र हाता ।।०।।

या सुवर्णक्षणांचे आम्ही जाहलो भागीदार
या क्षणांचे आम्हांवर ऋण आहेत अपार
स्वानंदाशिवाय आनंद न रुचे मनाशी
एकसंघपणा, सहकार्य, आपलेपणाची भावना रुजे मनीमानसी।।०।।

**अलका जोशी**
**परवाना आकाशचिन्ह विभाग**

**(Me and my work (duty)- how I feel and live it. - by Raajjdiep)**

## ""तपती धूप""

उम्मीद न कर ऐ दोस्त यहाँ।
काटों से तू फूलों की
चुभन ही सदा, देते हैं ये
यह जात है जो इन दिल जलोंकी
उम्मीद न कर ऐ दोस्त यहाँ,
काटों से तू फूलों की ।

जब – जब पडा है मौका
एक पल को न तू है चूका
जी जान से तुने लडी थी,
हर जंग यहाँ असूलों की ।
उम्मीद न कर ऐ दोस्त यहाँ,
काटों से तू फूलों की ।

हर एक फैसले तेरे
होती पत्थर की लकीर थी
चलती तेरी तलवारें जो
फटती थी हर ढालों की
उम्मीद न कर ऐ दोस्त यहाँ,
काटों से तू फूलों की ।

तू चला तो साथ तेरे
कलम अदालत की भी साथ चली
देखा सबने था, खुला आसमान
हटी पल में भीड बादलों की
उम्मीद न कर ऐ दोस्त यहाँ,
काटों से तू फूलों की ।

सेज भी तुमने अजीब है सजाई
सदा नुकीले इन काटोंकी
तमन्ना हर एक जब करता है
सुंदर खुश–हाल फुलों की
उम्मीद न कर ऐ दोस्त यहाँ,
काटों से तू फूलों की ।

अटूट मेहनत–दिलों जाँ से चाहत
कोशीश है तुम्हारी बुलंदी छूने की
धूप तपती तुम सहते रहे
छाँव थी जब, सावनी झुलों की
उम्मीद न कर ऐ दोस्त यहाँ
काटों से तू फूलों की ।

**राजदीप बि.धुसिया, उप अभियंता**
**परवाना व आकाशचिन्ह विभाग**